दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य सपादक सागर राणा अभोरे   सपादक बडूभाऊ इगोले

वाशीम ■ शुक्रवार दिनांक 23 मे 2025 ■ वर्ष : 1 ले ■ अंक : 359 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL03935

# धमन्यांमधून रक्त नव्हे, गरम सिंदूर वाहतेय !

**बिकानेर :** जेव्हा 'सिंदूर' दारुगोळा होतो तेव्हा काय परिणाम होतात याची जगाला प्रचिती आली आहे. इतकेच नव्हे, तर देशाच्या शत्रूलाही त्याची चांगलीच जाणीव झाली आहे. आपल्या धमन्यांमधून रक्त नाही तर गरम सिंदूर वाहत आहे, असे स्पष्ट करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी पाकिस्तानला पुन्हा एकदा इशारा दिला.

बिकानेर येथील जाहीर सभेत बोलताना मोदी यांनी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादावर जोरदार टीका केली. पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिल्याचे ते म्हणाले. पहलगाम येथे निष्पापांवर गोळ्या झाडल्या गेल्या. पण त्या गोळ्या १४० कोटी भारतीयांना लागल्या. यानंतर प्रत्येक नागरिकाने संकल्प केला होता की, दहशतवादाला मातीत गाडले जावे. आम्ही तीनही दलांना मोकळीक दिली आणि त्यांनी असा चक्रव्यूह रचला की पाकिस्तानला गुडघे टेकावे लागले, असे

संमिश्र पानावर

## पंतप्रधानांचा पाकला पुन्हा इशारा



### 'अमृतभारत' योजनेंतर्गत १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटन

'अमृतभारत' योजनेंतर्गत देशातील १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे गुरुवारी झाले. यात रेल्वेच्या नागपूर विभागातील नेताजी सुभाषचंद्र बोस ईतवारी, चांदा फोर्ट आणि आमगाव या स्थानकांचा समावेश आहे.

### सिंदूर जेव्हा दारुगोळा बनतो

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरात आम्ही २२ मिनिटांत दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उद्ध्वस्त केले. जेव्हा सिंदूर दारुगोळा होतो तेव्हा काय परिणाम साधतो, हे आता जगाने आणि देशाच्या शत्रूनेही पाहिले आहे. हवाई हल्ल्यानंतर आपण येथे आलो होतो तेव्हाच म्हणालो होतो की, या मातीची शपथ आहे, देशाची मान झुकू देणार नाही. आज राजस्थानच्या भूमीमधून देशातील नागरिकांना नम्रपणे सांगू इच्छितो की, जे लोक कुंकू (सिंदूर) पुसायला निघाले होते त्यांना आम्ही मातीत गाडले. जे भारताचे रक्त सांडत होते, त्यांच्याकडून रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा हिशेब घेतला आहे, असेही मोदी म्हणाले.

### मस्तिष्क शांत

स्वातंत्र्यप्राप्तीपासून कित्येक दशके हेच सुरू होते. पाकिस्तान दहशतवाद पसरवून निर्दोष लोकांचे बळी घेत होता. पण पाकिस्तान हे विसरला की, भारताचा सेवक मोदी इथे छातीठोकपणे उभा आहे. मोदीचे मस्तिष्क शांत असले तरी मोदीचे रक्त उसळत आहे. आता तर मोदीच्या धमन्यांतून रक्त नाही तर गरम सिंदूर वाहत आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

### नो ट्रेड, नो टॉक्स, आता फक्त पीओकेवर चर्चा

नो ट्रेड, नो टॉक्स, आता फक्त पीओकेवर चर्चा होईल, असा इशाराही मोदींनी यावेळी दिला. पाकव्याप्त काश्मीरचा प्रश्न सुटेपर्यंत पाकिस्तानशी कोणत्याही प्रकारची व्यापारी चर्चा होणार नाही. एवढेच नाही तर सिंधू पाणी कराराचा संदर्भ देत मोदी म्हणाले की, भारताच्या हक्काचे पाणी पाकिस्तानला मिळणार नाही.




कराडमधील कृष्णा नदीवरील खोडशी धरण मान्सून दाखल होण्यापूर्वीच अवकाळी पावसामुळे भरून वाहू लागले आहे.

# अवकाळी पावसाचे धुमशान सुरूच

**रायगड, रत्नागिरीत आज 'रेड अलर्ट'**

**मुंबई, ठाणे, पालघरला दोन दिवस 'ऑरेंज अलर्ट'**

**अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान; शेतकरी हवालदिल**

**मेघगर्जनेसह अतिवृष्टीचा इशारा**

**मुंबई :** राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला असून मुंबई, पुणे, विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यांना झोडपून काढले आहे. मे महिन्यात कोसळणाऱ्या पावसामुळे अनेक जिल्ह्यांतील व्यवस्था कोलमडली असून शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. गुरुवारी सकाळपासून मुंबई, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यात पावसाची उघडझाप सुरूच होती. दरम्यान, अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने पुढील दोन दिवस पावसाचा जोर कायम राहणार आहे.

महाराष्ट्रातील रायगड, रत्नागिरीत शुक्रवारी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आले असून मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यात शुक्रवार व शनिवारी 'ऑरेंज अलर्ट' तर संपूर्ण कोकण किनारपट्टी भागातही उद्या शुक्रवारी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आले असून कोकणासह महाराष्ट्रातील काही भागात मेघगर्जनेसह अतिवृष्टी

संमिश्र पानावर






## संपादकीय

### अवकाळीचा कहर; हजारो हेक्टरवरील पिकांची, फळबागांची नासाडी

दरवर्षी मृग नक्षत्राकडे डोळे लावून बसणाऱ्या बळीराजाच्या डोळ्यांत यंदा अवकाळी पावसाने पाणी आणले आहे. अवकाळी पाऊस असो की पाहुणा, कोणालाच हवासा नसतो. तो अनाहुतपणे आला की तारांबळ उडते. तशी ती सध्या शेतकऱ्यांची उडाली आहे. रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा आदी पिकांची काढणी आणि नंतरच्या मशागतीची सगळी कामे शिल्लक असताना अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या आणि काढून मळणीसाठी ठेवलेल्या पिकांचा अक्षरशः चिखल झाला. हजारो हेक्टरवरील पिकांची, फळबागांची नासाडी झाली. शेतीच्या कामात मग्न असलेल्या आणि वादळवारे पाहून झाडांच्या आश्रयाला गेलेल्या कित्येक शेतमजुरांच्या अंगावर विजा कोसळून त्यांचा करुण अंत झाला. शिवाय, किती मुक्या प्राण्यांचे जीव गेले, किती झाडे जमीनदोस्त झाली याची तर मोजदादच नाही. पारनेर तालुक्यातील एका शेतकऱ्याने आठ एकरवर हरभरा घेतला. पण, काढणीच्या आधीच गारांचा मारा झाला आणि संपूर्ण पीक जमीनदोस्त झाले. पीकविमा मंजूर व्हायच्या आधीच बँकेकडून कर्ज वसुलीची नोटीस आली! ही कथा महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांची आहे. मृग, आर्द्रा या नक्षत्री पावसामुळे रान आबादान होण्यापूर्वीच या अवकाळीने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लावला आहे. ही सगळी धूळधाण पाहून यंदा पावशा नावाचा पक्षीदेखील 'पेरते व्हा'ची हाक देईल की नाही, शंकाच आहे. अलीकडच्या काळात शेती आणि शेतकरी कायमच अस्मानी आणि सुलतानी संकटाचे बळी ठरत आहेत. कधी-कधी ऋतूनिहाय चांगला पाऊस पडतो. पेराल ते उगवते. भरपूर पिकते. पण, बाजारात ते कवडीमोल भावात विकावे लागते. शेतीमालाच्या विक्री व्यवस्थापनातील वाढत्या हस्तक्षेपामुळे कष्टाने पिकविलेल्या धान्याचे योग्य मोजमाप होईलच याची शाश्वती नाही. शिवाय, संकटकाळात शेतकऱ्यांच्या मदतीला सरकार नावाची व्यवस्था धावून येईलच असेही नाही. निवडणूक काळात केलेल्या घोषणांचा जिथे विसर पडतो, तिथे अवकाळीसारख्या संकटात मदत मिळेलच, याची काय 'गॅरंटी'? अवकाळीने हजारो हेक्टरवरील पिकांची नासाडी केली असली तरी अजून नुकसानीचे पंचनामे सुरू झाल्याचे अथवा तसे आदेश निघाल्याचे ऐकिवात नाही. यथावकाश निघतीलही, पण तेव्हा खूप उशीर झालेला असेल. कारण अवकाळीने केवळ रब्बीच नव्हे तर येत्या खरीप हंगामावरदेखील पाणी फेरले आहे. पेरणीपूर्व मशागतीची कामे वेळेत पूर्ण झाली नाहीत, तर खरिपाची पेरणी कशी होणार? केवळ शाश्वत आणि हवामानपूरक शेती करा, एवढा उपदेश करून भागणार नाही. गरजेप्रसंगी मदतीचा हात पुढे करावा लागेल. कारण आता दावलगावच्या शेतकऱ्यांची स्पर्धा केवळ धारणीच्या शेतकऱ्यांशी नव्हे तर कॅलिफोर्नियातील कॉर्पोरेट फार्मरशी आहे. तिथलाही निसर्ग लहरी आहे. पण, सरकारचे पाठबळ भक्कम असल्याने तिकडच्या शेतकऱ्यांस असल्या अवकाळीची पर्वा नसते. त्यात निसर्ग स्वतःची भाषा बदलतो आहे. ग्लोबल वॉर्मिंग, पर्यावरणीय असमतोल, वाढते प्रदूषण आणि झपाट्याने होत असलेले शहरीकरण यामुळे ऋतूंची घडी विस्कटली आहे. त्यातून आलेले हे 'अवकाळी' संकट केवळ कृषी अर्थव्यवस्था आणि कृषक समाजापुरते मर्यादित नसून, एकूणच मानवजातीसाठी ती एक भयसूचक चाहूल मानायला हवी. पूर्वी हवामानाचे चक्र ठरलेले होते. जूनमध्ये पावसाळा, ऑक्टोबरमध्ये परतीचा पाऊस आणि मग थंडी. पण, आता निसर्गचक्राची दिशा बदलत चालली आहे. एप्रिल-मेमध्ये एकीकडे सूर्य आग ओकत असतानाच अचानक आभाळ भरून येते आणि कुठे गारपीट, तर कुठे वादळी वाऱ्यासह धो-धो पाऊस पडतो. हवामानातील बदल, जागतिक तापमानवाढ, हवामानचक्रातील अडथळे आणि प्रदूषण आदी कारणे या अवकाळी संकटामागे असली तरी निसर्गात होत असलेला अमर्याद मानवी हस्तक्षेप यास मुख्यत्वे कारणीभूत आहे, यावर जगभरातील तज्ज्ञांचे एकमत आहे. 'ग्लोबल वॉर्मिंग' हा शब्द आता केवळ परिषदा आणि परिसंवादापुरता मर्यादित राहिलेला नाही. तुमच्या-आमच्या जगण्यावरदेखील त्याचे थेट परिणाम जाणवू लागले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावर जग बदलण्याचे भलेही दावे केले जात असले तरी निसर्गापुढे सारे काही फिके आहे, हेच खरे. आभाळाला दोष देऊन तरी काय होणार? मूठभरांच्या चंगळवादाने जगाच्या पोशिंद्यावर आणलेल्या या 'अवकाळी' संकटावर अजून तरी अक्सीर इलाज सापडलेला नाही.

# कृषी सहाय्यकांना न्याय द्यावा

महाराष्ट्र जीत

देशात कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. कृषीमूळेच देशात साधन सामुग्री मूबलक प्रमाणात उपलब्ध होऊन अर्थव्यवस्था अधिक बळकट होते. मूळात शेतीत पिकलं तरच आपल्याला खायायला मिळेल. शेती हा पारंपरिक व्यवसाय असल्याने व ती महत्वाची जीवनदायी नाळ असल्याने शेतीचे महत्वही जास्त आहे. देशात शेतीला पूरक अशी व्यवस्था म्हणून अन्य यंत्रणा काम करतात ज्यामुळे शेतक-याच्या बांधावर जाऊन शासकीय यंत्रणेमार्फत शासकीय धोरण राबविण्यास मदत होते. या यंत्रणेमध्ये कृषी विभाग महत्वाची भुमिका कृषी सहाय्यकाच्या माध्यमातून बजावत असतो. अगदी सांगायच झालंच तर शेतकरी व शासन यामधील दुवा म्हणून राज्यातील कृषी सहाय्यक काम करत आहेत. मात्र कृषी सहाय्यकाच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याने शासनाने याची वेळीच दखल घेऊन समस्याचे निराकरण करायला हवे. राज्यातील कृषी सहायकांवर वाढत्या अन्यायाविरोधात संतापाची लाट उसळली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या असून, सरकारने त्वरित कार्यवाही न केल्यास मोठे आंदोलन छेडण्याचा इशारा काही महिन्यापूर्वी संघटने कडून देण्यात आला होता. मात्र वेळीच दखल न घेतल्याने आंदोलनाचे हत्यार राज्यभरातील कृषी सहाय्यक संघटनेस उपसावे लागले. राज्यात विविध जिल्ह्यांत गेल्या काही महिन्यांत कृषी सहायकांच्या अडचणी, समस्या वाढलेल्या आहेत. सिल्लोडमध्ये एका सहायकाने वरिष्ठांच्या जाचापायी आत्महत्या केली होती. काही ठिकाणी कर्मचाऱ्यांवर हल्ले, महिला कर्मचाऱ्यांना सापत्न वागणूक अशा घटना सातत्याने होत आहेत. या सर्व प्रकरणांत वरिष्ठांकडे वेळोवेळी तक्रारी संबंधितांनी दिलेल्या होत्या मात्र त्यावर कुठलीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे कृषी सहाय्यकात रोष वाढत गेला . तातडीने या बाबत कठोर पाऊले उचलण्यात आली असती तर कदाचित कृषी सहाय्यकावर आंदोलन करण्याची वेळ आली नसती. सध्या महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेच्या वतीने राज्यभरात आंदोलन पर्याय नसल्याने छेडण्यात आलेले असुन टप्प्या-टप्पाने आंदोलनाची धार वाढत आहे. संघटनेने दिलेल्या पत्रात, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील कृषी सहायक योगेश सोनवणे यांची आत्महत्या, पालघरमधील श्रीकांत गवळी यांना झालेली मारहाण, पनवेल तालुका कार्यालयात महिलांना अशोभनीय, लज्जास्पद शब्द वापरून अपमानित करणे, तसेच यवतमाळ जिल्ह्यात दारव्हा तालुका प्रभारी कृषी अधिकाऱ्याच्या मनमानी कारभारामुळे कृषी सहायक सामूहिक रजेवर जात असल्याच्या प्रकरणे घडली असुन यामुळे कृषी सहाय्यकात रोष आहे. ही प्रकरणे पाहता वरिष्ठानी वेळीच लक्ष देऊन कारवाई करायला हवी होती मात्र तसे झालेले दिसत नाही. वाशीम जिल्ह्यातही कृषी सहायकांनी कृषी महोत्सवावर बहिष्काराचा इशारा दिला काही महिन्यापूर्वी दिला होता. कृषी सहाय्यक हा ग्रामीण भागातील



शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आपले काम कुठलीही साधन सामग्री नसतांना करीत असतो. कृषी विभागात जवळपास २५ प्रकारचे अप कृषी सहायक आपल्या मोबाइलमध्ये हाताळतो तरी सुद्धा शासना कडून लॅपटॉप उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना, सोयाबीन कापूस अनुदान योजना, जलयुक्त शिवार योजना, सूक्ष्म सिंचन योजना, पीकविमा योजना, नानाजी देशमुख संजीवनी (पोकरा) योजना, अग्रीस्टॅक योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना, 'मनरेगा'तून फळबाग योजना, महाडीबीटी योजना, नैसर्गिक पंचनामे, एनएचएम अंतर्गत योजना, शेतीशाळा, क्रॉपसॅपयोजना, आरकेव्हीवायअंतर्गत जमीन आरोग्य पत्रिका वाटप, आत्मा अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजना, सेंद्रिय शेतीनैसर्गिक शेती या योजना, अहिल्यादेवी होळकर फळरोप वाटिका योजना, पीक कापणी प्रयोग, खरीप-रब्बी आढावा बैठका व इतर योजनांच्या ऑनलाइन बैठकांची कामे कृषी सहाय्यक आपल्या मोबाईलवर करतात. शेती हा संवेदनशील विषय असुन पिकवू तर खाऊ या प्रमाणे शासनाने कृषी सहाय्यकास अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साधने उपलब्ध करुन द्यायला हवीत जेणेकरून शेतीची कामे जलदगतीने विहीत वेळेत होतील. शेती हा देशातील सर्वात मोठा व्यवसाय असुन यासाठी लागणारे मनुष्यबळही मोठ्या प्रमाणात हवे. राज्यात कृषी सहाय्यकांची जवळपास दीड हजारांवर पदे रिक्त असल्यामुळे दोन ते तीन चार्ज एकाच कृषी सहाय्यकास सांभाळावे लागत आहेत. प्रकरणांचे गांभीर्य पाहता संघटनेने ७ मार्चला निवेदन दिले होते. त्याची वरीष्ठ स्तरावरून अजूनपर्यंत दखल घेण्यात आली नाही. यामुळे राज्यातील कृषी सहाय्यका मध्ये रोष, शासनाविरुद्ध नाराजी व्यक्त केली जात आहे. कृषी सहाय्यकांच्या समस्या वाढत चालल्याने राज्य शासनाकडे कृषी सहाय्यकांच्या अडचणी मांडून काही ठराविक मागण्या करण्यात आल्या आहेत. जसे की- कृषी सेवक कालावधी रद्द करून कृषी सेवकांना नियमित कृषी सहायक पदावर नियुक्ती देण्यात यावी, कृषी सहायकांचे पदनाम बदलून सहायक कृषी अधिकारी करावे, डिजिटल कामकाजासाठी कृषी सहायकांना लॅपटॉप देण्यात यावेत, ग्रामस्तरावर मदतीसाठी कृषी मदतनीसांची नेमणूक करावी, कृषी निविष्ठा वाटपात वाहन भाड्याची तरतूद करावी किंवा परमिटद्वारे वाटप करावे, कृषी विभागाच्या आकृतीबंधास तत्काळ मंजुरी देऊन त्यामध्ये कृषी पर्यवेक्षकांची पदे वाढवून कृषी सहायकांच्या पदोन्नतीमधील कुंटितावस्था दूर करावी. महसूल विभागाप्रमाणे आकृतीबंध करावा. कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक यांचे प्रमाण ४ : १ या प्रमाणे करावे, पोकरा योजनेमध्ये समूह सहायकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावी, रोजगार हमी योजनेअंतर्गत लक्ष्यांक देतांना क्षेत्रीय स्तरावरील अडचणीचा विचार करावा, नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे करणे व तद्भतर करावयाच्या कामाबाबत महसूल, ग्रामविकास व कृषी विभागाच्या जबाबदाऱ्यांबाबत योग्य न्यायसंगत कार्यपद्धती तयार करण्यात यावी. या मागण्यांसाठी कृषी सहायक संघटनेने राज्यभरात आंदोलनपुकारले आहे. या मागण्यांची तात्काळ सोडवणूक न केल्याने कृषी सहायक संघटना विविध टप्प्यांवर आंदोलन करत आहे.कृषी सहाय्यकाच्या आंदोलनाने कृषी कामे प्रभावीत झाली असुन शासनाने शक्य तितक्या लवकर मागण्याची दखल घ्यायला हवी. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर कृषी सहाय्यक आंदोलन करत असल्याने शेती कामात शेतक-यांना अडचणी निर्माण होत आहेत. कृषी सहाय्यक समस्याची सोडवणूक शासनाने शक्य तितक्या लवकर करुन तोडगा काढावा जेणेकरून कृषी काम सुरळीत सुरु होतील व शेतकरी बांधवाना कोणत्याही अडचणीस सामोरे जाण्याची वेळ येणार नाही.

**शब्दसंकलन**
**सौ. संगिता खंदारे**
**कृषी सहाय्यक**
**औंढा जि. हिंगोली**

# विजय शहा यांचा वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा. :- कॉ.महादेव नागरगोजे

## भारत देशाची लेक कर्नल सोफिया कुरेशी यांचा आम्हाला अभिमान

महाराष्ट्र जीत

**पाटोदा (प्रतिनिधी) -** धार्मिक कट्टरता बाळगत महिला सैन्य अधिकाऱ्यांविरोधात अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या मध्य प्रदेश सरकारचा मंत्री विजय शहा यांच्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी. अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ.महादेव नागरगोजे यांनी केली आहे. भारताने ऑपरेशन सिंदुर केल्याा नंतर या मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या कर्नल सोफीया कुरेशी हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग या दोघी रणरागिणी पाकिस्तानातील दहशवाद्यांना ज्या पाकिस्तान २६/११ च्या हल्यापासून आज पर्यंत पोसले असून त्या पाकिस्तान मधील अतिरेक्याचे ९ अड्डे उधवस्त करुन १००( शंभर) अतिरेक्याना



यमसदनी पाठवले या मध्ये कर्नल सोफिया कुरेशी यांनी जम्मु काश्मीर मध्ये सर्वाधिक सर्चिंग केले ज्या जम्मु काश्मीर मधील पहेलगाम येथे अतिरेक्याने जात आणि धर्म विचारून २८ देशबांधवांना गोळ्या घालून ठार माराले. त्या मुळे सारे भारतातील माता भगिनीच सिंदुर पुसले गेले. कर्नल साफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान मधील दहशतवादी स्थळे उद्धवस्त करून त्यांनी देशाचे नाव उज्जवल केले. कर्नल सोफिया कुरेशी या रणगिनीचे नाव देशाच्याच नव्हेतर जागतीक पातळीवर नेवून पोहच केले. त्या रणरागिणी कर्नल सोफीया कुरेशी विषयी मध्य प्रदेशाचे भाजप मंत्री कुंवर विजय शहा यांनी सैन्यातील वरिष्ठ अधिकारी सोफिया कुरेशी यांच्या विषय आक्षेपार्ह विधान केले. त्यानी ऑपरेशन सिंदुर दरम्यान माध्यमाना माहिती देणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आतंकवाद्यांची बहीण असे संबोधित केले. खंर तर मी असे म्हणेल की कर्नल साफिया कुरेशी या आतंकवाद्यांची बहिण नव्हे तर भारत देशाची शुरवीर बेटी आहे. खरे तर धर्म पाहून गोळ्या चालवणारे आणि धर्मावरून आतंकवाद्यांशी नाते जोडणार एकाच वृतीचे आहेत ही निच वृत्ती भाजपाची आहे. कारण ह्या गंभीर वक्तव्याची दखल मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने घेतली व गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. मात्र या दळभद्री भाजपाच्या सरकारने गंभीर प्रकरणाची कोणती ही दखल घेतली नसुन दिखाऊ पणा करत गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला तरी उच्च न्यायालयाने त्या वर ही गंभीर ताशेरे ओढले आहेत. तरी आक्षेपार्ह विधान करणाऱ्या मंत्र्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व अशा चुकीचे आक्षेपार्ह विधान करणारे भाजप मंत्री विजय शहा यांचा मी भारतीय कम्यूनिस्ट पक्षाचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून जाहीर तीव्र निषेध करत असून त्यांच्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांना भारत देशातून हद्दपार करावे. अशी मागणी कॉ.महादेव नागरगोजे यांनी केली आहे.

पान १ वरून

### अवकाळी पावसाचे धुमशान सुरूच

होईल, असा इशारा कुलाबा हवामान विभागाने दिला आहे.

गेल्या काही वर्षांत वातावरणीय बदलामुळे पाऊसही लहरी झाला आहे. त्यामुळे मे महिन्यात जुलै महिन्यासारखा पाऊस बरसत आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस सुरू आहे. मुंबई, पुण्यासह विदर्भ, मराठवाड्यात अनेक भागांत बुधवारी रात्री पाऊस झाला आणि गुरुवारी सकाळीही पावसाळी वातावरण होते. राज्यात पावसाचा जोर २४ मेपर्यंत कायम असणार आहे, असा अंदाज कुलाबा हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. पुढील दोन दिवस दक्षिण कोकण आणि दक्षिण-मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरीत 'रेड अलर्ट' जारी केले असून कोल्हापूर, सातारा, सांगली आणि पुणे जिल्ह्यांत जोरदार पावसाची शक्यता असल्याचा अंदाज कुलाबा हवामान विभागाने वर्तवला आहे.

यंदा मे महिन्यात उन्हाचे चटके सहन करण्याऐवजी नागरिक पावसाळ्याचा अनुभव घेत आहेत. मागील काही दिवसांपासून प्री-मान्सून पावसाला सुरुवात झाली आहे. सध्या हा पाऊस वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह होत आहे. वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० किलो मीटरपर्यंत असण्याची शक्यता आहे. काही भागांमध्ये जोरदार ते अति जोरदार पाऊस बरसण्याची शक्यता आहे.

**ताशी ३५ ते ६० किमी वाऱ्याचा वेग**

दक्षिण कोकण किनारपट्टी, गोवा, पूर्व-मध्य अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून पुढील ३६ तासांत तो अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उत्तरेकडे वारे वाहू लागल्याने संपूर्ण कोकण किनारपट्टी भागात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आले आहे. तर वाऱ्याचा वेग ३५ ते ४० किंवा ६० किलोमीटर ताशी असेल. त्यामुळे काही भागात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून गुजरात किनारपट्टी व कोकण किनारपट्टीवर मच्छीमारांनी पुढील चार दिवस समुद्रात जाऊ नये, असे आवाहन कुलाबा हवामान विभागाच्या अधिकारी शुभांगी भुते यांनी केले आहे.

### धमन्यांमधून रक्त नव्हे, गरम सिंदूर वाहतेय!

पंतप्रधान म्हणाले.

**त्यासाठीच दहशतवाद**

मोदी पुढे म्हणाले की, भारत शांत राहील, असा जे विचार करत होते, आज ते घरात लपून बसले आहेत. जे स्वतःच्या शस्त्रावर गर्व करत होते, ते आज कोसळलेल्या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेत. पाकिस्तानवर टीका करताना पंतप्रधान म्हणाले की, पाकिस्तान भारताशी थेट लढाई कधीच जिंकू शकत नाही. जेव्हा जेव्हा थेट लढाई झाली, तेव्हा तेव्हा ते तोंडावर आपटले. यासाठीच ते भारताविरोधात दहशतवादाचा शस्त्राप्रमाणे वापर करतात.

### जम्मू-काश्मीरमध्ये २ दहशतवाद्यांचा खात्मा

केला. त्यामध्ये संदीप गायकर गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान ते शहीद झाले.

भारतीय लष्कराच्या व्हाइट नाइट कोअरने सोशल मीडियावर चकमकीची माहिती दिली आहे. त्यात एक जवान शहीद झाल्याचे सांगितले. गुरुवारी सकाळी किश्तवाडच्या छत्रू येथे पोलिसांसोबत लषकर संयुक्त मोहीम राबवत होते. त्यावेळी दहशतवाद्यांसोबत चकमक झाली. अजूनही गोळीबार सुरू आहे. या गोळीबारात एक जवान गंभीर जखमी झाला होता. पण उपचारावेळी त्याला वीरमरण आले, असे व्हाइट नाइट कोअरने सांगितले आहे.

किश्तवाडमध्ये सकाळी सात वाजण्याच्या सुमारास लष्कराच्या दोन पॅरा एसएफ, ११ आरआर आणि सातवी आसाम रायफल आणि एसओजी यांनी दहशतवाद्यांविरोधात संयुक्त मोहीम राबवली. सिंहपोरा येथे पथकांकडून शोध सुरू होता. त्यावेळी जोरदार चकमक झाली. दहशतवाद्यांच्या गोळीबाराला सुरक्षा दलांनी चोख प्रत्युत्तर दिले. चार दहशतवाद्यांच्या एका गटाला सुरक्षा दलांनी घेरले आहे. परिसरात अतिरिक्त जवान तैनात केले आहेत. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर चकमकीच्या परिसरातील सर्व रस्ते बंद करण्यात आलेत.

# आता महाबळेश्वरहून जा थेट कोकणात



## सातारा-रत्नागिरीला जोडणार केबल ब्रिज

**कराड**

कोकण किनारपट्टी आणि पश्चिम महाराष्ट्र हे दोन विभाग आता आणखी जवळ येणार असून पश्चिम महाराष्ट्रातून कोकणात फिरायला जाणाऱ्यांची संख्या पाहता सरकारने कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी केबल ब्रिज बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

पश्चिम महाराष्ट्रातून कोकणाकडे प्रवास करण्यासाठी पर्यटकांना अनेक मार्ग आहेत, पण त्यामध्ये वेळ खूप जातो. कोकण हे निसर्गरम्य आणि शांत समुद्रकिनाऱ्यांसाठी प्रसिद्ध आहे तर पश्चिम महाराष्ट्रात राखड डोंगराच्या कुशीत सौंदर्य बहरल आहे. महाबळेश्वरसारखे थंड हवेचे ठिकाणही आहे. त्यामुळेच या दोन विभागाला जोडण्यासाठी केबल ब्रिज तयार करण्यात येणार आहे. केबल ब्रिज तयार झाल्यास सातारा आणि कोकणातील अंतर कमी होणार आहे, त्याशिवाय प्रवासाचा वेळही वाचणार आहे.

केबल-स्टेड पूल बांधल्यानंतर पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणमध्ये प्रवास अधिक चांगला आणि वेगात होणार आहे. महाबळेश्वर आणि रत्नागिरीला थेट जोडणारा एक नवीन केबल-स्टेड पूल बांधण्यात येत आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सातारा जिल्ह्यातील तापोळा ते रत्नागिरीतील गडवली अहिर या ठिकाणांना जोडला जाणार आहे. या ब्रिजमुळे महाबळेश्वर आणि कोकणमधील ५० किलोमीटर अंतर कमी होणार आहे. दोन ते तीन तासांचे कमी होणार आहे.

हा केबल-स्टेड पूल दुर्गम कोयना खोऱ्यातून जाईल आणि खेड तालुक्यातील रघुवीर घाटामार्गे रस्ता उपलब्ध करेल. हा ब्रीज तयार झाल्यास निसर्गाचा अद्भूत नजारा पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होईल. या ब्रिजचे काम पूर्ण झाल्यावर रत्नागिरीहून येणाऱ्या प्रवाशांना महाबळेश्वरला जाण्यासाठी पोलादपूरमार्गे लांबलचक अंबेनाली घाटाचा रस्ता घ्यायची गरज लागणार नाही. त्याऐवजी, ते नव्या पुलामार्गे तापोळ्याला पोहोचू शकतील आणि कास पठारामार्गे साताऱ्याला जाऊ शकतील. या प्रवासात वेळ वाचणार आहेच, त्याशिवाय निसर्गाचा अद्भुत नजारा पहायला मिळेल.

#### गॅलरी पर्यटनाचे आकर्षण

मुंबईतील आयकॉनिक बांद्रा-वरळी सी लिंकपासून प्रेरणा घेऊन हा ब्रिज तयार होणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील हा पहिला केबल-स्टे पूल असेल. हा पूल ५४० मीटर लांब आणि १४ मीटर रुंद असेल. पर्यटकांना निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी, मध्यभागी ४३ मीटर उंची गॅलरी उभारली जाणार आहे. ही गॅलरी पर्यटन आकर्षण ठरणार आहे. कोयना बॅकवॉटर्स आणि सह्याद्रीच्या डोंगरांमधील सूर्योदय आणि सूर्यास्त या गॅलरीमधून पाहता येणार आहे.

#### पश्चिम महाराष्ट्राच्या प्रवासात नवी क्रांती

मुख्य पुलाव्यतिरिक्त, बामणोली-आपटी मार्गावर आणखी एक पूल बांधला जात आहे. यामुळे तापोळा ते सातारा अंतर १० ते १५ किलोमीटरने कमी होईल. याचा फायदा स्थानिक रहिवासी आणि पर्यटकांना होईल. या दुहेरी पुलामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या प्रवासात नवी क्रांती येणार आहे. पर्यटनाला चालना तर मिळेलच. कोकण किनारपट्टी आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील अंतरही कमी होणार आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्यम प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )

१ २ ३ ४ ५ ६

## सुझुकी मोटर कंपनीच्या लकी ड्रॉ मध्ये जिंकली चार चाकी कार

महाराष्ट्र जीत

**नवीन पनवेल वार्ताहर**




सुझुकी मोटर कंपनी इंडियाच्या वतीने संपूर्ण भारतभर लकी ड्रॉ योजना राबवण्यात आली. या लकी ड्रॉ मध्ये पनवेलच्या कनक सुझुकी शोरूम मधून दुचाकी घेतलेले दत्ताराम मारुती भगत यांनी चार चाकी कार जिंकली. 21 मार्च रोजी त्यांना ही कार देण्यात आली. संपूर्ण भारतभरातून एकमेव कार विजेते दत्ताराम भगत ठरले. सुझुकी मोटर कंपनी इंडियाच्या वतीने एक सप्टेंबर 2024 ते 30 नोव्हेंबर 2024 पर्यंत गाडी घेणाऱ्या ग्राहकांसाठी लकी ड्रॉ स्कीम राबवण्यात आली. रोहा येथील दत्ताराम भगत यांनी सप्टेंबर महिन्यात बर्गमॅन ही दुचाकी पनवेल येथील कनक शोरूम मधून विकत घेतली. त्यामुळे ते या लकी ड्रॉ स्कीम मध्ये सहभागी झाले. लकी ड्रॉ चा निकाल नुकताच लागला. यावेळी प्रथम मेगा पारितोषिक मारुती सुझुकी फ्रॉन्स ही चार चाकी कार दत्ताराम भगत यांना लागली. 21 मार्च रोजी त्यांना ही कार देण्यात आली. यावेळी कनक शोरूमचे डायरेक्टर जितेश मारू, सुझुकीचे एरिया मॅनेजर रणवीर सिंह यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. यावेळी लकी ड्रॉ मध्ये कार जिंकलेले दत्ताराम भगत यांनी सर्वांचे आभार मानत कार मिळाल्याने आनंद झाला असल्याचे सांगितले आणि नागरिकांनी सुझुकी कंपनीच्या गाडी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

## प्रितम जनार्दन म्हात्रे यांचे भाजप जनसंपर्क कार्यालय लोकसेवेच्या कार्यासाठी ...लोकनेते रामशेठ ठाकूर

महाराष्ट्र जीत




**प्रतिनिधी/ पनवेल :-** नव्याने भाजप पक्षात प्रवेश घेतलेल्या प.महा.के चे माजी विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या गुरु शरणम् कॉम्प्लेक्स विश्राळी नाका येथील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन गुरूवार दि. २२ मे २०२५ रोजी लोकनेते माजी खासदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर,आ. महेश बालदी, आ.विक्रांत पाटील, मा. सभापती व महाराष्ट्र प्रदेश कार्यकारीणी सदस्य बाळासाहेब पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदी प्रितम म्हात्रे समर्थक पदाधिकारी व कायकर्ते मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी प्रितम म्हात्रे यां बोलताना सांगितले की, पक्ष कार्यालयाच्या माध्यमातून जूना नवा,गट तट न करता पक्ष संघटनात्मक धोरणातून देश सेवा व्हावी लोकउपयोगी कार्य व्हावे जसे नागरिकांच्या मूलभूत सुविधा मध्ये येणाऱ्या अडचणी शैक्षणिक क्षेत्रातील प्रवेश, शाळेचे दाखले, नागरिकांच्या समस्या, कुणालाही कसलीही मदत देण्यासाठी हे कार्यालय सदैव तत्पर आहे. दि. १० मे रोजी भाजपामध्ये पक्ष प्रवेश झाल्यानंतर लोकांच्या समस्या सोडवताना आमच्या सोबत विकासाच्या मुद्द्यावर अजूनही अनेक कार्यकर्ते भाजपामध्ये येत आहेत. त्याचा मला अभिमान आहे. हीच आमच्या कामाची पावती असून जो पर्यंत शेकाप मध्ये होतो तोपर्यंत पक्षाची पक्षनिष्ठा पाळत होतो , त्याचप्रमाणे आज ही असेल त्या पक्षात गद्दारी ही भावना न मनात कदापि नसेल . पक्षनिष्ठा बाळगून पक्षाचे व संघटनेच्या धोरणानुसार पूर्वीसारख्याच नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबध्द असल्याचे प्रितम म्हात्रे यांनी सांगितले.

## गेवराई सेमी, बनकिंन्होळा, बाभुळगाव,वरखेडी,भायगाव या पंचक्रोशीसाठी सक्रिय पूर्णवेळ वायरमन देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी :-**

**सिल्लोड:** तालुक्यातील गेवराई सेमी, बनकिनोळा, भायगाव वरखेडी बाभूळगाव या गावामध्ये पूर्णवेळ सक्रिय वायरमन देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे कार्यकारी अभियंता अविनाश राऊत यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे, निवेदनात म्हटले आहे की या पंचक्रोशीमध्ये विजेची नेहमी समस्या असते पंचक्रोशीची लोकसंख्या व ग्राहक संख्या जास्त असून सुद्धा येथे वायरमन पूर्ण वेळ उपलब्ध होत नसल्याने ग्राहकांची मोठी तारांबळ होत असून मानसिक त्रास त्यांना सहन करावा लागत आहे, या भागामध्ये विजेच्या समस्येवरती पूर्णवेळ निराकरणाची गरज असून सक्षम सक्रिय माणूस उपलब्ध करून देण्यात यावे.

याप्रसंगी पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रा.राहुलकुमार ताठे, युवक विधानसभा अध्यक्ष विजय पवार, युवक उपाध्यक्ष दादाराव गोडसे, खुशाल फरकाडे, द्वारकादास परकाडे, उत्तम ताठे, लक्ष्मण मख , नितीन माकोडे सर पदाधिकारी उपस्थित होते.



## मोरा ते भाऊचा धक्का सागरी प्रवास महागला.

महाराष्ट्र जीत

**उरण /प्रतिनिधी**

मोरा हे भारतातील उरण शहराला सेवा देणारे बंदर आहे. येथील रहिवाशांचा व्यवसाय मुख्यतः मासेमारीशी संबंधित आहे. मोरा भाऊचा धक्का हा प्रवास फायदेशीर सुखद आणि जलद म्हणून ओळखला जातो वाहतूक कोंडीची दगदग नसल्याने या सागरी मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे .त्याशिवाय दरवर्षी पावसाळी हंगामात गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा अलिबाग भाऊचा धक्का ते रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूकही बंद ठेवण्यात येते. यात मांडवा अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोरा भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूहि बंद ठेवण्यात येते. परंतु सोमवार २६ मे पासून उरणच्या मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यानचा जलप्रवास २५ रुपयांनी महागणार आहे. पावसाळ्यात अनियमित जलप्रवासामुळे महाराष्ट्र मेरीटाईम मंडळाकडून मोरा ते मुंबईच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे त्यामुळे या प्रवासाकरता प्रवाशांना एका फेरीसाठी ८० रुपयाऐवजी १०५ रुपये मोजावे लागणार आहेत. ही दरवाढ ४ महिन्यांसाठी लागू राहणार असून सप्टेंबर




पासून पुन्हा एकदा ८० रुपये दर करण्यात येतील. गेल्या अनेक वर्षापासून उरणच्या मोरा ते मुंबई दरम्यानची जलवाहतूक पावसाळ्यातही सुरू असते मुंबई ते अलिबाग दरम्यानची जलसेवा पावसाळ्यात बंद असते .अशा स्थितीत समुद्रातील लाटांचा सामना करीत मोरा मुंबई सेवा सुरू असते ,उरण ते नेरूळ बेलापूर ही लोकल सेवा सुरू झाली आहे त्यामुळे या मार्गावरील प्रवासी संख्या घटली आहे .या घटलेल्या प्रवासी संख्येचा फटका या विभागाला बसला आहे ,असे असले तरी या मार्गाने परंपरागत प्रवास करणारे प्रवासी आहेत त्यामुळे ही सेवा सुरू आहे .या सेवेसाठी मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी मोरा मुंबई जलमार्गासाठी २५ रुपयाची वाढ करण्यात आल्याची माहिती मोराबंदर अधिकारी नितीन कोळी यांना यांनी दिली आहे.

## नितीन बगाटे यांची रत्नागिरीचे पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती

### रत्नागिरी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बगाटे यांच्या नियुक्तीमुळे नागरिकांमध्ये उत्साह

महाराष्ट्र जीत

रत्नागिरी जिल्ह्याचे नवे जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून नितीन दत्तात्रय बगाटे यांची नियुक्ती झाली आहे.माजी पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांची बदली झाल्याने ही जागा रिक्त होती.छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस उपायुक्त असलेले बगाटे हे डॅशिंग आयपीएस अधिकारी म्हणून ओळखले जातात.यापूर्वी त्यांनी सिंधुदुर्ग येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. हिंगोली जिल्ह्यातील निशाणा येथील रहिवासी असलेले बगाटे यांनी आयआयटीमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुण्यात खासगी कंपनीत काही काळ नोकरी केली. सुरुवातीला शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या बगाटे यांनी नंतर आयपीएस परीक्षा उत्तीर्ण करून पोलीस सेवेत प्रवेश केला.२०१८ ते २०२० या कालावधीत ते परभणी येथे प्रशिक्षणार्थी सहायक पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होते.परभणी,चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग येथे त्यांनी आपल्या दबंग कामगिरीने ख्याती



मिळवली आहे.परभणी येथे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान बगाटे यांची तत्कालीन विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांच्याशी बाचाबाची झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सभेत डी झोनमध्ये शिरलेल्या कार्यकर्त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्याने हा वाद उद्‌भवला.तसेच,वाळू टिप्पर पकडल्यावरून त्यांचा खासदार संजय जाधव यांच्याशीही वाद झाला होता.या घटनांनी त्यांची कणखर अधिकारी म्हणून ओळख निर्माण झाली. रत्नागिरी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बगाटे यांच्या नियुक्तीमुळे नागरिकांमध्ये उत्साह आहे. त्यांच्या अनुभवाचा उपयोग अवैध गतिविधींवर नियंत्रण ठेवण्यासाठी होईल, अशी अपेक्षा आहे.रत्नागिरीतील अंमली पदार्थांचा व्यापार नष्ट करण्याचे मोठे आव्हान बगाटे यांच्यासमोर असणार आहे.बगाटे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा अधिक प्रभावी होईल,अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## दिव्यांगांचा निधी ग्रामपंचायतींनी वाटप करावा ; दिव्यांग संघटनांची मागणी

महाराष्ट्र जीत

**किनवट प्रतिनिधी**

ग्रामपंचायती अंतर्गत वार्षिक उत्पन्नाच्या पाच टक्के निधी हा दिव्यांग बांधवांना वाटप करण्यात येतो; परंतु, काही ग्रामपंचायतींकडून पाच टक्के निधी अद्याप वाटप झालेला नाही.तो त्वरीत वाटप करण्यात यावा, अशी मागणी सेक्युलर दिव्यांग मुव्हमेंट चे जिल्हाध्यक्ष अड.मिलिंद सर्पे व प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे अध्यक्ष भगवान मारपवार यांनी केली आहे. ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामपंचायतीच्या वार्षिक उत्पन्नाच्या पाच टक्के निधी हा दिव्यांग बांधवांना वाटप करण्यात येतो; परंतु, काही ग्रामपंचायतींकडून अद्याप पाच टक्के निधी वाटप झालेला नाही, तर काही ठिकाणी ग्रामसेवकांकडे वार्षिक उत्पन्नाची विचारणा केली असता, समाधानकारक माहिती मिळाली नाही, तसेच वार्षिक उत्पन्नाच्या कोणता कागदोपत्री लेखाजोखा दाखविण्यात आला नाही. ज्या ग्रामसेवकांनी निधी खर्च केला नाही अशा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ही सर्पे व मारपवार यांनी केली आहे. पाच टक्के निधी खर्च केला नाही, तर दिव्यांग संघटनांकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, तसेच शासनाच्या घरकुल योजनेत दिव्यांग बांधवांना समाविष्ट करण्यात यावे व दिव्यांगांसाठीच्या विविध योजनांचे फलक ग्रामपंचायतीत दर्शनी भागात लावण्यात यावे, अशी मागणी दिव्यांग संघटनांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात करण्यात आली आहे. || काही ग्रामपंचायतचे उत्पन्न लाखामध्ये असूनसुद्धा ग्रामसेवकांकडून ग्रामपंचायतीचे उत्पन्न तोंडी कमी सांगण्यात येत आहे. त्यामुळे दिव्यांगांना त्यांच्या हक्काचा निधी प्राप्त होत नाहीय. बंद लिफाफ्यात तीनशे, पाचशे ते हजार रुपयांपर्यंत वाटप करून दिव्यांगांची चेष्टा करण्यात येत आहे.||

– भगवान मारपवार, प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, किनवट तालुकाध्यक्ष

## कोरोना संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने घेतली आयुक्त मंगेश चितळे यांची भेट

महाराष्ट्र जीत



**पनवेल, वार्ताहर**

कोरोना संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेवून आवश्यक त्या उपाययोजनांसदर्भात मागणी केली. वाढत्या कोरोना संकटाबाबत चर्चा आणि उपाययोजनांबाबत शिवसेना पक्षाच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याशी चर्चा करताना पूर्ण जगभरात,भारतात, तसेच महाराष्ट्रातील ठिकठिकाणी कोरोना संक्रमण पुन्हा डोकं वर काडीत असून, रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या अनुषंगाने महानगर संघटक मंगेश रानवडे यांच्या अध्यक्षतेखाली आज शिवसेना पक्षाचे पदाधिकारी यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व महानगरपालिका च्या पदाधिकाऱ्यांबरोबर याबाबत सखोल चर्चा केली. शिवसेना पक्षाच्या शिष्टमंडळामध्ये उपस्थित असलेले महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनवणे, खारघर शहर संघटक इम्तियाज शेख, विभाग संघटिका सौ ज्योती नाडकर्णी, पनवेल उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, पनवेल उपसघटक सिद्धेश खानविलकर, पनवेल शहर प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान, उपविभाग प्रमुख गुलाब बागवान यांनी आयुक्तांना कोरोना संकटाला आळा घालण्यास विविध उपाय योजनांची मागणी केली. त्यामध्ये लसीकरण क्वारंटाईन वार्ड उभा करणे, कोरोना टेस्टिंग ची यंत्रणा उभी करणे अशा विविध मागण्या नमूद केलेले निवेदन पनवेल महानगरपालिकेला सादर केले. आयुक्त मंगेश चितळे यांनी याबाबत शिष्टमंडळात माहिती देताना नमूद केले की सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच आपला दवाखाना मध्ये, कोरोना संबंधित अतिदक्षता व लक्षण असल्यास त्वरित ट्रीटमेंट संबंधी आदेश जारी केलेले आहेत व त्याचप्रमाणे खाजगी रुग्णालयांमध्ये सुद्धा याबाबतची सतर्कता सर्व डॉक्टरांना देण्यात येणार आहे.

## ईमरानभाई सय्यद यांनी स्वताच्या घरी कामाला असलेल्या हिंदु मुलीच लग्न हिंदु संस्कृती प्रमाने स्वखर्चाने लावले

महाराष्ट्र जीत

**रत्नागिरी प्रतिनिधी**

चिपळूण गोवळकोट येथे राहणारे ईमरानभाई सय्यद यांनी स्वताच्या घरी कामाला असलेल्या हिंदु मुलीच लग्न हिंदु संस्कृती प्रमाने स्वखर्चाने लावून दिले. लहान पणी आई वडिलांचे छत्र हरवलेली प्रतीभा इमरान भाईच्या घरी गेले सोळा वर्षे तिथेच राहुन घरकाम करत सोळा वर्षे ईमरानभाई नी कधीही दुजाभाव न दाखवता स्वताच्या बहिणी प्रमाने वागवले आणि आता लग्नाची वेळ आल्यावर मात्र ईमरानभाई नी तीच्या ईच्छे प्रमाने हिंदु संस्कृतीप्रमाणे लग्न लावून दिले. केवळ विवाह लावून देयाचा म्हणून लावला नाही. नाही तर मुलांची परिस्थिती ची परिपूर्ण माहिती घेऊन हा विवाह ठरवण्यात आला . या विवाह सोहळ्यात ईमरानभाई चे संपूर्ण कुटुंब च सहभागी झाला होत. दागदागिने भांडी तसेच संसाराला लागणारे सर्व साहित्य देऊन सय्यद कुटुंबीयांनी सर्व जबाबदारी व कर्तव्य पार पाडत कन्या दान करून एक शाही विवाह सोहळा पार पाडत समाजापुढे एक आदर्श घालून दिला आहे. सय्यद कुटुंबियांच्या या आदर्श विवाह सोहळ्याची दखल घेत चिपळूण नगरपरिषदेचे प्रशासक व मुख्याधिकारी अतुल भोसले यांनी सय्यद कुटुंबियांना ऑफिस मध्ये बोलावून विशेष कौतुक केले आहे. या सोहळ्याप्रसंगी नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. नगरपरिषदेने केलेल्या सन्मानाबदल सय्यद कुटुंबाने नगरपरिषदेच्या आधिकार्यासह सर्वाचे आभार मानले आहेत.



## भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ पनवेलमध्ये महाविकास आघाडीची तिरंगा यात्रा

महाराष्ट्र जीत

**पनवेल (वार्ताहर):**

जम्मू काश्मीर येथील पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर दिले. भारतीय लष्कराचे मनोबल उंचावण्यासाठी पनवेलमध्ये बुधवारी (दि. २१ मे) सकाळी १० वाजता महाविकास आघाडीच्यावतीने तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले नागरिक आणि दहशतवाद्यांविरोधातील कारवाईत शहीद जवानांना श्रध्दांजली वाहण्यात आली. तिरंगा यात्रेत महात्मा गांधी यांच्या वेशभूषेतील व्यक्तीरेखेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यात्रेच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर तिरंगा यात्रेला सुरुवात झाली. तर पनवेल शहरातून यात्रा काढून काँग्रेस भवन येथे तिरंगा यात्रेचा समारोप करण्यात आला. यावेळी देशभक्तीपर गीतांच्या सुरावटीत भारत मातेचा जयजयकार करण्यात आला. तसेच 'पाकिस्तान मुर्दाबाद- आतंकवाद मुर्दाबाद' म्हणत दहशतवादी कृत्याचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांच्या हाती 'तिरंग्याखाली चालतो भारत मातेला वंदन करतो, हिंदुस्थान जिंदाबाद, भारत माता की



जय, भूदल नौदल हवाईदल जिंदाबाद, भारतीय सैन्याचे आभार, दहशतवाद्यांचा खात्मा भारतीय सेनेचा अभिनंदन, सैन्याच्या सन्मानार्थ भारतीय नागरिक एकत्र', अशा घोषणा लिहिलेले फलक होते. यावेळी 'हिंदुस्तान जिंदाबाद-पाकिस्तान मुर्दाबाद, दूध मांगोगे तो खीर देंगे काश्मीर मांगोगे तो चीर देंगे' अशा घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी माजी आमदार हुस्नबानू खलीफे, पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सुदाम पाटील, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शिकापचे ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, जिल्हा चिटणीस राजेश केणी, अनिल ढवळे, माजी नगरसेवक लतीफ शेख, नगरसेविका शशिकला सिंग, निर्मला म्हात्रे, युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, कॅप्टन कलावत,अवचित राऊत, दीपक घरत, नोफिल सय्यद, अमित लोखंडे, जसविंदर सैनि, शशिकांत बांदोडकर,सुरेश पाटील,कांती गंगर, बबन केणी, शिल्पा पाठक, मनोज बिरादार,सुदेशना रायते,जयश्री खटकले, आरती ठाकूर नीता शेनोय, कलावती माळी, माधुरी गोसावी, यतीन देशमुख, अरुण कुंभार, शौकत खान, प्रमोद भगत, शंकर म्हात्रे, विलास फडके, देवेंद्र मडवी,जयेश लोखंडे, चेतन म्हात्रे,रमेश राव, रमेश गोवारी,प्रविण जाधव, विश्वनाथ मते, किरण सोनावणे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पतीनेच सुपारी देवून मारले आपल्या पत्नीला ; 3 अटकेत

महाराष्ट्र जीत

**पनवेल, (वार्ताहर)**

उलवेमध्ये अलवीना किशोरसिंग उर्फ अलवीना अदमली खान (27) या विवाहितेची तिच्याच पतीनेचे सुपारी देऊन हत्या घडवून आणल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट-2 च्या पथकाने तपास करत मृत विवाहितेचा पती किशोरसिंग राजपूत तसेच हत्येची सुपारी घेणारी महिला अलिशा त्यागी आणि तिची सहकारी डिंपल या तिघांना अटक केली आहे. मात्र, ज्या दोघा मारेकऱ्यांनी अलवीना हिची हत्या केली, ते मारेकरी फरार झाले असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेतील मृत अलवीना अदमली खान पती किशोरसिंग राजपूत याच्यासोबत उलवे, सेक्टर-5 मधील विजय लक्ष्मी टॉवरमध्ये राहत होती. अलवीना आणि तिचा पती किशोरसिंग दोघेही त्याच परिसरात मेडीकल शॉप चालवत होते. अलवीना मुंबईतील आपल्या नातेवाईकांकडे गेली होती. तेथून ती रात्री 11.45 वाजण्याच्या सुमारास उलवे येथील घरी परतत असताना तिच्या घरापासून अवघ्या 50 मीटर अंतरावर अज्ञात मारेकऱ्याने तिला गाठून तिच्या गळ्यावर धारदार चाकुने वार करुन पलायन केले होते. यात अलवीनाचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर उलवे पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरुध्द विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली होती. याप्रकरणी गुन्हे शाखा युनिट-2 कडून सुध्दा या प्रकरणाचा समांतर तपास करण्यात येत होता. गुन्हे शाखेने केलेल्या तपासात मृत अलवीना आणि तिचा पती किशोरसिंग या दोघांमध्ये मागील काही वर्षापासून आर्थिक देवाण-घेवाणीतून वाद सुरु असल्याचे तसेच दोघेही घटस्फोट घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सदर माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने संशयावरुन किशोरसिंग याची उलटतपासणी केली. सुरुवातीला त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. मात्र, नंतर पोलिसांनी त्याची कसून चौकशी केल्यानंतर त्यानेचे सुपारी देऊन अलवीनाची हत्या घडवून आणल्याची कबुली दिली.

**घटस्फोट देत नसल्यामुळे हत्या...**

अलवीना हिने किशोरसिंगला व्यवसायासाठी 15 लाख रुपये दिले होते. सदर पैसे ती किशोरसिंग याच्याकडे मागत होती. त्यातच अलवीनाचे दुसऱ्या व्यक्तीसोबत संबंध जुळल्याने किशोरसिंग याने अलवीनाकडे घटस्फोटाची मागणी केली होती. मात्र, पैसे दिल्याशिवाय घटस्फोट देणार नसल्याचे तिने किशोरसिंगला बजावले होते. त्यामुळे या दोघांमध्ये गेल्या काही वर्षापासून वाद सुरु होता. 15 लाख रुपये दिल्यानंतर देखील अलवीना घटस्फोट देणार नसल्याची भिती किशोरसिंग याला होती. त्यामुळेच त्याने सुपारी देऊन अलवीनाची हत्या घडवून आणल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**हत्येसाठी 7 लाखाची सुपारी...**

पोलिसांनी केलेल्या तपासात किशोर सिंग याने अलवीनाची हत्या घडवून आणण्यासाठी उलवेत राहणाऱ्या अलिशा त्यागी या महिलेला 7 लाखांची सुपारी दिल्याचे उघडकीस आले आहे. त्यातील 5 लाख रुपये त्याने दिले होते, हत्या झाल्यानंतर उर्वरित 2 लाख रुपये देण्याचा त्यांच्यामध्ये व्यवहार ठरला होता. त्यानुसार अलिशा त्यागी हिने तिची सहकारी डिंपल हिच्या ओळखीतून पंजाब येथून एका मारेकऱ्याला बोलावून घेतले होते. त्यानेच अलवीनावर पाळत ठेवून तिची भररस्त्यात गळा चिरुन हत्या केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. त्यानुसार पोलिसांनी किशोरसिंग राजपूत, अलिशा धनप्रकाश त्यागी (38) आणि डिंपल चरणजीत फत्तेसिंह कौर उर्फ डिंपल (34) या तिघांना अटक केली आहे. तसेच पोलिसांनी फरार दोघा मारेकऱ्यांचा शोध सुरु केला आहे.

दैनिक महाराष्ट्र जीत
शुक्रवार दिनांक २३ मे 2025
वाशीम जिल्हा


## कोकण विभागात सार्वजनिक बांधकाम उपविभाग मोखाडा प्रथम

### कार्यालयीन मूल्यमापन मोहिमेत अव्वल स्थान

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीतः दयानंद शिंदे**



महाराष्ट्र शासन व भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या कार्यालयीन मूल्यमापन १०० दिवसांचा कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत मोखाडा सार्वजनिक बांधकाम उप विभाग मोखाडा कार्यालयाच्या कोकण विभागातून प्रथम क्रमांकावर आले आहे. या मोहिमेत शासकीय कार्यालयांचे कामकाज,कार्यक्षमता,पारदर्शकता, जनतेशी संवादी साधने, नागरिकांना वेळेवर सेवा देणे, आदी घटकांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले. उपअभियंता विशाल अहिरराव यांनी कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्यात कामात गुणात्मक सुधारणा घडवून आणली आहे. राज्यभरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे मूल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने १०० दिवसांचा कृती आराखडा हा उपक्रम राबवण्यात आला. कोकण विभागातील बांधकाम विभागाच्या श्रेणीत मोखाडा उपविभाग प्रथम आल्याने या कार्यालयाचे प्रमुख अहिरराव यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. बांधकाम विभाग म्हटले की भ्रष्टाचार आणि तत्सम बाबींचीच जास्त चर्चा नेहमी होत असते मात्र पहिल्यांदाच हे कार्यालय प्रशंसा करण्याच्या कसोटीवर खरे उतरले असून इ प्रशासन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छता, अनावश्यक कार्यालयीन कागदपत्रांची विल्हेवाट, कार्यालयीन सोयी सुविधा,नावीन्यपूर्ण उपक्रम, आधुनिक तक्रार निवारण प्रणाली या सारख्या अनेक विभागांत सुधारणा केल्या मुळे हे यश प्राप्त झाले आहे.

या यशाचे श्रेयमाझ्या सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना जाते तसेच आमचे कार्यकारी अभियंता नितीन भोये यांनी वेळेवेळी आमचे मनोबल वाढवले असे अहिरराव यांनी म्हटले आहे. अधिकारी लोकप्रतिनिधी, यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांना अपेक्षित लोकाभिमुख, गतिमान पारदर्शक प्रशासन तयार करण्यासाठी त्यां १०० दिवसांत विशेष प्रयत्न करण्यात आले. या पुढेही असेच काम अविरत सुरू राहील. सेवांची गुणवत्ता तसेच या विभागा अंतर्गत येणाऱ्या फक्त कार्यालयिन नाही तर प्रत्यक्ष काम देखील गुणवत्ता पूर्वक होण्यासाठी आमचे प्रयत्न असतील असे उपअभियंता विशाल अहिरराव यांनी महाराष्ट्र जीतशी बोलतांना सांगितले.

## आगामी बकरी ईदसाठी भिवंडी मनपा प्रशासनाचे , "तय्यार है हम"

### 56 कुर्बानी सेंटरला मान्यता, वाहने व साधनसामुग्रीसह सज्ज.

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके).** येत्या 07 जून, 2025 ते 09 जून, 2025 या कालावधीत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बकरी ईद सण साजरा होणार असुन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्देशीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार केलेल्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आज महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका अधिकारी, पोलीस विभाग, पशु वैद्यकीय विभाग यांचे समवेत बैठक पार पडली. या बैठकीमध्ये आयुक्तांनी बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, वाहन विभाग, आरोग्य विभाग, पशु वैद्यकीय अधिकारी आणि पोलीस विभाग यांचेशी संवाद साधुन त्यांचे स्तरावर करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला. मागील वर्षी महानगरपालिकेमध्ये 56 ठिकाणी तात्पुरते कुर्बानी केंद्र स्थापन करण्यास प्रभाग स्तरावरुन परवानगी देण्यात आली होती.



यावर्षी देखील 56 ठिकाणी कुर्बानी होणे अपेक्षित आहे. तसेच, या 56 केंद्राकरिता 200 टेम्पो, 14 जेसीबी, 11 जीप, 3 क्रेन इतक्या वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कुर्बानीनंतर तेथील भागाची स्वच्छता करण्याकरिता 25 पाण्याचे टँकरचे अधिग्रहण करण्यात आले आहे. तसेच, कुर्बानीपुर्वी जनावरांची तपासणी करण्याकरिता पशुवैद्यकीय विभागाकडून 96 पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आले आहे, हे अधिकारी 06 जून रोजी शहरात दाखल होतील. सहायक पोलीस आयुक्त श्री. सचिन सांगळे यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने त्यांचीही तयारी पुर्ण झाली असून, बकरी ईद पुर्वी शहरातील मौलाना व कसाई संघटना यांचेसोबत येत्या नजीकच्या काळात बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे बैठकीदरम्यान नमुद केले. आयुक्तांनी आरोग्य विभागाला निर्देश देताना म्हटले की, जे टेम्पो जनावरांचे अपशिष्ट उचलणेकामी निश्चित केले आहेत, त्या वाहनांना क्रमांक देऊन प्रभागनिहाय वाहनांचे वाटप करावे जेणेकरुन कुर्बानीनंतर लवकरात लवकर त्या भागात स्वच्छता करता येईल. तसेच, पाणी पुरवठा विभागाने देखील तातडीने पाण्याचे टँकर पाठवून, तो भाग स्वच्छ करावा. त्यानंतर आरोग्य विभागाने तेथे औषध फवारणी व पावडर फवारणी करावी. तसेच अपशिष्ट. टाकण्याकरिता करण्यात येणाऱ्या खड्डयांमध्ये वेळोवेळी औषध फवारणी करण्याचे सक्त निर्देश दिले आहेत. महानगरपालिका प्रशासनाने सर्वधर्मसमभाव या तत्वाने कार्यवाही करावी व शहरातील सामाजिक, धार्मिक सौहार्दपुर्ण वातावरणात बकरी ईद सण पार पाडावा, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले कर्तव्य नियोजनबद्ध पार पाडावे आणि मा . उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने शहरातील नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असेही निर्देश आयुक्तांनी दिले. तसेच बकरी ईद च्या कालावधीत शहरातील कचरा उचलण्याचे काम बंद राहणार असून, नागरीकांनी या कालावधीत त्यांच्या घरात जमा होणारा कचरा एका पिशवीत साठवून तो नंतर घंटागाडीमध्येच टाकावा. जेणेकरुन शहरात या तीन दिवसात कचऱ्यामुळे दुर्गंधी व रोगराई पसरणार नाही. याकरिता शहरातील नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्तांनी केले. यावेळी अतिरीक्त आयुक्त (1) श्री. देविदास पवार, मा. अतिरीक्त आयुक्त (2) श्री. विठ्ठल डाके, मा. सहायक पोलीस आयुक्त सचिन सांगळे, उपायुक्त (मुख्या). श्री. विक्रम दराडे, उपायुक्त (मार्केट) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, शहर अभियंता जमील पटेल, सहायक आयुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे, सहायक आयुक्त (मार्केट) नितीन पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर खोत, अशोक रत्नपारखी, विनायक गायकवाड, ज्ञानेश्वर कदम, श्री. विश्वास डगळे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप गाडेकर यांसह महानगर पालिकेचे अन्य वरिष्ठ अधिकारी व विभाग प्रमुख उपस्थित होते .

## चला...स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत स्वच्छता कमी आणी फोटो सेशन जास्त करुया..!

महाराष्ट्र जीत

स्वच्छतेचे जनक राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी कोणताही फायद्याचा विचार न करता स्वच्छतेचा संदेश आपल्या प्रत्यक्ष कृती व किर्तनातून दिला. आपल्या हळूवार व लोकहिताच्या कामाची नोंद जग घेत हे वास्तव आहे यासाठी नुसता गाजावाजा करायची गरज काय? काम कमी आणी जास्त काम केल्याचा आव आणणं हे समीकरण सध्या रुढ झालं आहे. सध्या भारतात फोटो प्रेमी लोकांची संख्या न मोजता येण्यासारखी. फोटो सेशन इतरांनी बोध घेण्यासाठी करावं लागत हे सुंदर उत्तर हे फोटो प्रेमी देत असले तरी त्यांनी स्वछता मोहीमेत सहभागी होऊन किती भाग स्वच्छ केला असेल न सांगण्या सारखं. आजकालची स्वच्छता मोहीम की निव्वळ गाजावाजा, बॅन्डबाजा सारखीच. स्वच्छता म्हणजे स्वच्छतेने जगण्याची सवय. जिथे स्वच्छ राहून शरीर निरोगी राहते, तिथे शरीर आणि मन दोन्हीच्या आनंदासाठी स्वच्छता आवश्यक असते. स्वच्छता, सर्व लोकांनी त्यांच्या दैनंदिन दिनचर्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. महात्मा गांधी म्हणाले होते - 'स्वच्छता ही सेवा आहे. आपल्या देशासाठी आपल्या जीवनात स्वच्छतेची नितांत गरज आहे. घाणीचा आपल्या सभोवतालच्या वातावरणावर आणि जीवनावर परिणाम होतो. आपण वैयक्तिक आणि सभोवतालची स्वच्छता ठेवली पाहिजे आणि इतरांनाही ते करण्यास प्रेरित केले पाहिजे. जीवनातील स्वच्छता



म्हणजे निरोगी राहण्याची स्थिती. स्वच्छता ही एक चांगली सवय आहे जी आपल्या जीवनाची गुणवत्ता वाढवते. तो आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. शरीराची स्वच्छता देखील आपल्यासाठी खूप महत्वाची आहे, जसे की दररोज आंघोळ करणे, स्वच्छ कपडे घालणे, दात घासणे, नखे कापणे इ. यासाठी आपण रोज सकाळी उठल्याबरोबर दात स्वच्छ केले पाहिजेत. चेहरा, हात पाय धुतले पाहिजेत. यासोबतच स्नान आणि दैनंदिन विधी वेळेवर पूर्ण करायला हवेत. निरोगी राहणे आणि शांततेने जीवन जगणे हा एक चांगला गुण आहे. यासाठी घरातील वडीलधाऱ्यांनी, पालकांनी आणि मुलांनी ही सवय आपल्या मुलांमध्ये रुजवली पाहिजे, जेणेकरून त्यांना स्वच्छतेचे महत्त्व कळेल. स्वच्छ भारत अभियान - हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधींच्या १४५ व्या जयंतीनिमित्त सुरू केलेले एक महत्त्वाचे अभियान होते. नवी दिल्लीतील राजघाट येथून ही मोहीम सुरू करण्यात आली. ही एक राष्ट्रीय स्तरावरील मोहीम होती आणि तो भारत सरकार उपक्रम होता. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनेक योजनांचा समावेश करण्यात आला, ज्यामध्ये गावकऱ्यांच्या घरात शौचालये बांधणे ही मुख्य गोष्ट आहे, जेणेकरून लोकांना आपल्या सभोवतालच्या स्वच्छतेचे महत्त्व समजेल आणि पर्यावरण स्वच्छ राहील पाहिजे. स्वच्छता राखण्यासाठी इकडे-तिकडे कचरा टाकू नये. कचरा नेहमी डस्टबिनमध्ये टाकावा. स्वच्छतेत देवाचा वास असतो असेही म्हटले आहे. त्यामुळे स्वच्छतेचा अंगीकार करून देशाला पुढे नेऊ शकतो. स्वच्छतेनेच भारतातील गाव आदर्श बनवता येईल. त्यामुळे इतरांनाही स्वच्छतेसाठी प्रेरित करा. प्लास्टिकचा वापर टाळावा. प्लॅस्टिकच्या बॅग्स मुळे पर्यावरणाला धोका आहे. प्लॅस्टिक मानवी जीवनाला सतत विष देत आहे. लोक सकाळपासून संध्याकाळपर्यंत प्लास्टिकचा वापर करतात. मानव ज्याला वरदान मानतो ते खरं तर पर्यावरण, प्राणी आणि आपल्या सर्वांसाठी अत्यंत घातक आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि आजूबाजूचे वातावरण स्वच्छ ठेवण्यासाठी झाडे लावणे अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावावीत मात्र असे होतांना दिसत नाही. पावसाळ्यात बेंडकांनी डराव डराव करावं असे हे फोटो प्रेमी कधी-मधी स्वच्छतेच्या नावावर फोटो सेशन करायला दिसत असतात. एक विशेष म्हणजे स्वच्छता अभियान राबवितांनाही त्यांनी परीधान केलेले कपडे पांढरे शुभ्र, नविन करकरीत असतात. आपल्या घरात जेव्हा कोणी स्वच्छता अभियान राडवित असल्याच आपण बघत असु तर त्यांनी घातलेले कपडे जुने, मळकट आणी फाटकेही असु शकतात मात्र रस्त्यावरच्या जे स्वच्छता फोटो प्रेमी असतात त्यांना नविन कपड्याचा मोह आवरत नाही. नविन कपडे घालून कदाचित त्यांना स्वच्छता करतांना जास्त प्रसन्न वाटत असेल. स्वच्छता ही एका दिवसाची नसावी. मनाची व परीसराची स्वच्छता रोजची करायला हवी. जेणे करून स्वच्छता आपण केलेल्या कामामुळे आनंद मिळेल. काळ बदलला, लोक बदलले मात्र गरजा ह्या त्याच जुना आहेत फक्त पध्दत बदलली. कोणतही अभियान हे केवळ फोटो सेशन व ठराविक काळा पुरत मर्यादित असु नये तुर्तास एवढंच.

**शब्दसंकलन**
**विनोद भिमराव पट्टेबहादुर**
**मानसशास्त्र अभ्यासक**
**मु. सिव्हील लाईन, वाशिम**

## महाराष्ट्र भूषण समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख यांचे कीर्तन”

### श्री समर्थ कृपा भजन मंडळाच्या १५ व्या वर्धापन दिनाचा भक्तिमय सोहळ्याचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**विरार** :(केतन भोज);वारकरी परंपरेत आध्यात्मिक ओढ,भक्तिभाव आणि सामूहिक साधनेचा प्रसार करणाऱ्या श्री समर्थ कृपा भजन मंडळ,नालासोपारा (विरार)यांच्या वतीने १५ वा वर्धापन दिन रविवार,८ जून २०२५ रोजी साजरा होणार असून,या दिवशी “महाराष्ट्र भूषण समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख” यांचे श्रवणीय,प्रभावी आणि समाजमनाला जागं करणारे कीर्तन भक्तजनांना मोरेश्वर विद्यालयाजवळ,मोरेगाव नाका,विरार रोड,नालासोपारा (पूर्व),ता.वसई,जि.पालघर – ४०१२०९ येथे आयोजन केले आहे. “संतांची शिकवण आणि भक्तीचा सोहळा” या संकल्पनेतून हा कार्यक्रम सजलेला असून,दिवसभर आध्यात्मिक,सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी दिवसभराचा कार्यक्रम :सकाळी ६.०० वा.–श्री सत्यनारायण महापूजा,सकाळी ८.०० वा. – दीपप्रज्वलन व सामूहिक पालखी सोहळा,स.९.४३ वा.–विशेष गाडी वेळ – विरार ते चर्चगेट दुपारी – पंचपदी परीक्षक सत्कार,नंतर भव्य भजन स्पर्धा स्पर्धा वैशिष्ट्ये १५० पेक्षा अधिक भजन मंडळांचा सहभाग,YouTube Live प्रसारण,दुपारी – स्नेहभोजन,हळदी-कुंकू समारंभ सायं.५.०० वा.– ह.भ.प. निवृत्तीमहाराज देशमुख यांचे प्रबोधनात्मक कीर्तन रात्रौ ७.१५ वा.–मान्यवर सत्कार व भजन स्पर्धेचे बक्षीस वितरण या कार्यक्रमा साठी संत सेवा भजन सामाजिक संस्था,संत ज्ञानेश्वर माऊली भजन संस्था यांसह अनेक नामवंत मंडळे सहभागी होणार असून,सामाजिक,शैक्षणिक आणि आध्यात्मिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे

अध्यक्ष – अरविंद मोरे,संस्थापक – ह.भ.प.विश्वनाथ बांद्रे, कार्याध्यक्ष – प्रणव लांबाडे,खजिनदार – जनार्दन शिंदे (बापू),सचिव – गजानन जोशी,उपाध्यक्ष – राजेश येले,सहखजिनदार – राजुदादा पाडावे, उपसचिव – अनिल बेकरे ,संपर्क प्रमुख – सचिन धाडवे, सदस्य – सत्यवान केसरकर,संदीप तावडे, सुनील पांढरे व इतर कार्यकर्ते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व पदाधिकारी व सदस्य अत्यंत नियोजनपूर्वक तयारी करत असून,श्री समर्थ कृपा भजन मंडळा तर्फे सर्व वारकरी भक्त,भजनप्रेमी आणि श्रद्धावंत भाविकांना या भक्तिरसात न्हालेल्या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "भक्ती, कीर्तन, आणि संतांची शिकवण यांचा संगम अनुभवण्यासाठी आपण उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## वाशिम नगरपालिकेत स्वच्छतेचे तीन तेरा!

### लोका सांगे ब्रह्मज्ञान स्वतः मात्र कोरडे पाषाण! शहरात घाणीचे साम्राज्य; पाण्याअभावी सार्वजनिक स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था....

महाराष्ट्र जीत

**महादेव हरणे**

**वाशिम : -** ऐतिहासिक आणि पर्यटन दृष्टिकोनातून प्रसिद्ध असलेले वाशिम शहरातील बालाजी मंदिर, पदमतिर्थ, राघोजीचा लाल किल्ला इ. सध्या साफसफाईच्या बाबतीत संपूर्णपणे हतबल झाले आहे. शहरातील गटारे, रस्ते, कचरा व्यवस्थापनासोबतच नगरपालिका देखरेखेतील सार्वजनिक ठिकाणी अत्यंत दयनीय परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे लोकांना स्वच्छतेचे डोस पाजणाऱ्या नगरपालिकेची अवस्था ही लोका सांगे ब्रह्मज्ञान स्वतः मात्र कोरडे पाषाण अशी झाली आहे. वाशिम नगरपालिकेच्या हद्दीत अस्वच्छता दिवसेंदिवस वाढत असून, सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढिग, वाढलेले गवत, गटारांतील साचलेले पाणी यामुळे डासांचा उपद्रव वाढला आहे. इतकेच नव्हे तर, खुद्द नगरपालिकेच्या जवळील भागातील परीसरात अस्वच्छता झाली आहे, नागरिक वापरत असलेली स्वच्छतागृहे सुद्धा पाण्याअभावी निकामी झाली आहेत. 'हगणदारी मुक्त शहर', 'स्वच्छ शहर, सुंदर शहर' असे नारे फक्त बोर्डांवरच उरले आहेत. गवळी पुरा ते पाळेश्वर मंदिर या रस्त्यावर, हिंगोली रोड व अन्य भागात आजही उघड्यावर शौच केली जात आहे.

**नागरिकांचा त्रास कायद्यात मांडणार का?**
नगरपालिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना व कर्मचाऱ्यांना मूळ गरजा पूर्ण न होण्यामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. स्वच्छतागृहात पाणी नसणे ही केवळ व्यवस्थापनातील हलगर्जीपणाची नव्हे, तर सामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ करण्यासारखी बाब ठरत आहे.

**नगर परिषदा झाल्या टेंडर युक्त**
आज काल नगर परिषदा सर्व नियोजीत टेंडर काढून ठरलेल्या कमिशन वर टेंडर देण्याचा ट्रेन्ड जिल्ह्यात सुरु आहे. टेंडर देण्या पासुन तर बिले काढण्या पर्यंत सब कुछ पैसा बोलता है मग सांगा तो टेंडर धारक कश्याला खरे काम करणार आहे. तो पन इकडच तिकडेच करुन बिले लाटणार ना? टेंडर प्रक्रीया ही केवळ अधिकारी आणी ठेकेदार जगविण्याची आणी राजकारणासाठी आपले चेले चपाटे पोशण्यासाठी केलेली सोय आहे हे वेगळे सांगायला नको.

**विकासाच्या गप्पा आणि जमिनीवर गटारातच साचलेली स्वप्ने!**
नगरपालिका जी शहराचा चेहरा मोहरा बदलण्याची स्वप्ने दाखवते, तीच जर आपल्या कार्यालयात मुलभूत सुविधा देऊ शकत नसेल, तर शहराचा विकास केवळ कागदावरच राहणार, असा सवाल आता वाशिमकर विचारू लागले आहेत. नगर परिषद हे भ्रष्टाचाराच मुख्यालय झालेल असुन इथे नांदा सौख्य भरे! तुम खावो मुझे भी खिलाओचा धंदा सुरु असल्याने शहर भकासच होणार ना!

## भु-वैकुंठ आत्मानुसंधान अड्याळ टेकडी येथे जीवन शिक्षण शिबिर संपन्न

महाराष्ट्र जीत

दिनांक ०५ ते २० मे २०२५ या कालावधीत दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा जीवन शिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्र व इतर राज्यातून २५७ प्रशिक्षणार्थी मुलं मुली सहभागी झाले होते. हे प्रशिक्षण आदरणीय सुबोधदादा मार्गदर्शक व संचालक भु-वैकुंठ अडयाळ टेकडी, डॉ. नवलाजी मुळे अध्यक्ष अडयाळ टेकडी, सुश्री रेखाताई, गंगाताई, लक्ष्मीताई, यांच्या मार्गदर्शनामध्ये सर्व प्रशिक्षकांनी 15 दिवसात सामू. ध्यान - सामू. प्रार्थना, भजन-भाषण, बौद्धिक, लाठी-काठी, दांडपट्टा, कराटे, विविध आसन, व स्वयं संरक्षणाचे धडे तसेच स्वावलंबन, स्वयंशिस्त, आरोग्यविषयी निसर्गोपचार, सेंद्रिय विषमुक्त शेती, गृहउद्योग,भाषण-संभाषण या सारख्या विविध विषयावर सर्व प्रशिक्षक यांनी अतिशय अल्पवधीमध्येच सर्व विद्यार्थ्यांना बहुआयामी व्यक्तीमत्व घडवण्यात मोलाचं कार्य केलेत.

या शिबिराचे समारोप दिनांक २० मे २०२५ ला आदरणीय सुबोधदादा यांच्या मार्गदर्शनात व आदरणीय डॉक्टर कुंभारे



साहेब,यांच्या अध्यक्षतेखाली, सन्माननीय वर्षाताई मोरे (मुंबई), सौ बेबीताई काकडे (आंबोली चौरस्ता), श्री देवरावजी कोंडेकर (ऊर्जा नगर), श्री लालचंद नखाते (मोखारा), सौ प्रांजलीताई कुबडे (नागपूर), श्री दिलीपभाऊ मेश्राम (गडचिरोली) अशा विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये या कार्यक्रमाला सुरुवात झाली. या शिबिरामध्ये १५ दिवस विद्यार्थ्यांनी जे प्रशिक्षण घेतले त्या सर्व कलागुणांचे सादरीकरण अतिशय उत्कृष्टपणे सादर केलेत, आणि पालकांनी टाळ्यांच्या गजराने त्यांचं कौतुक केले, ते सादरीकरण पाहून सर्व मान्यवर व पालक अतिशय आनंदून हर्षीत झालेत या कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सलामी व परेड देऊन सर्व मान्यवरांना मानवंदना दिली, वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कर्मयोगी तुकाराम दादांच्या प्रतिमा व अधिष्ठानचे पूजन दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली, त्यानंतर सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. नंतर विद्यार्थ्यांच्या मैदानी खेळास सुरुवात झाली योगा-सूर्यनमस्कार, डंबेल्स, कराटे तसेच देशभक्तीपर कृती गीत, तुकाराम दादा यांचे उत्स्फूर्त गीत लाठी - तलवार कवायत दानपट्टा अशा विविध कला- गुणांनी कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्व पालकांचे मनोरंजन केले आणि आपली कला सर्व आपल्या पालकांना दाखवली आणि पालक सुद्धा अतिशय आनंदित हर्षित झालेत, कार्यक्रम अतिशय सुंदरपणे यशस्वी झाला, या समारोपीय कार्यक्रमात आदरणीय सुबोधदादा यांचे अतिशय सुंदर मौलिक मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पुढील आयुष्य ग्रामगीते प्रमाणे जगण्यासाठी हमारे गाव मे, हमारा राज । कसे करता येईल, स्वतःचे जीवन कसे जगता येईल स्वावलंबन स्वराज्य याविषयी सुंदर मार्गदर्शन केले आणि त्यानंतर शिबिरात 15 दिवस भोजन व्यवस्थेमध्ये परीसरातील विविध गावच्या महिला पुरुष मंडळींनी जे भोजन कार्यासाठी आपली सेवा दिली, त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच सुभाषजी बोरकर, गणेशजी पुंडलिक रोडे, सेलोटे बावाजी, डॉक्टर लोकेश मुळे व त्यांची चमू यांनी सुद्धा व्यवस्थापनाची जबाबदारी चोखपणे पार पाडली एकूणच आदरणीय सुबोधदादा डॉक्टर नवलाजी मुळे साहेब आदरणीय सुश्री रेखाताई, लक्ष्मीताई, गंगाताई, यांच्या मार्गदर्शनामध्ये हा पंधरा दिवशीय शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाला, शेवटी राष्ट्रवंदना व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या शिबिरात प्रशिक्षक म्हणून श्री. अक्षय कुळे गुरुजी, श्री गणेश लांजेवार सर ब्रह्मपूरी कराटे असोसिएशन, जोषेश वाढई गुरूजी श्री मधुकर टिकले प्रबोधनकार, विशाल वैद्य गुरुजी, तसेच विशाल पोहिनकर, पराग खोकले, यश उरकुडे, साहिल बावणे, लोकेश जीवतोडे, रोहित मैंद, आरती ताई, पूजा ताई, शीतल भाजीपाले, तेजस्विनी भाजीपाले, संचिता बोरकुट, ऋतुजा कोंडेकर, वैदही दडमल, अनुष्का मोहोड, इ. प्रशिक्षक व प्रशिक्षिका यांनी विद्यार्थ्यांना घडविण्यात मोलाचे कार्य केलेत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदरणीय श्री निरंजन ठवरे सर व जोशेष वाढई यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आदरणीय सुश्री रेखाताई यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वी साठी सर्व गुरुदेव प्रेमी यांनी अथांग परिश्रम घेतले, धन्यवाद जय गुरु...!

## उरण,पनवेल, कर्जत खालापूर वासियांची ओंकारेश्वर, उज्जैन, इंदोर सहल संपन्न..!



महाराष्ट्र जीत

**उरण (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)**

प्रीती टूर्स कडून 14 ते 18 मे या दरम्यान पाच दिवसीय मध्यप्रदेश मधील ओंकारेश्वर, उज्जैन इंदोर ही सहल आनंदात आणि उत्साहात संपन्न झाली. या सहलीत महाराष्ट्र.. मध्यप्रदेश सीमेवरील राजेश्वरी देवी मंदिर, ओंकारेश्वर येथील ओंकारेश्वर, ममलेश्वर, नर्मदा स्नान, उज्जैन येथील सांदीपनी ऋषी आश्रम, कुंडेश्वर महादेव मंदिर,मंगळ ग्रह मंदिर,काळभैरव मंदिर, शनिदेव मंदिर, भृतहरी गुंफा, श्री हनुमान मंदिर, महाकालेश्वर मंदिर, महाराजा विक्रमादित्य मंदिर, हरीसिद्धी माता मंदिर,इंदोर येथील बडा गणेश मंदिर, शीश महाल, अहिल्याबाई होळकर वाडा आणि खजराना गणेश मंदिर पहिले.सर्वजण आरती, भक्तिगीते यात दंग झाले होते. ग्रुपमधील अनेकांनी महाकाल नाव असलेले शर्ट खरेदी करून परिधान केले होते. सर्वांनी प्रसाद, खाऊ, कपडे यांची भरपूर खरेदी केली. सहलीमध्ये चहा, नाश्ता, जेवण अतिशय रुचकर आणि स्वादिष्ट होते. सर्वांनी त्याच्यावर यथेच्छ ताव मारला. तसेच ओंकारेश्वर येथील नर्मदा पॅलेस अँड रिसॉर्ट आणि उज्जैन मधील जे के हॉटेल अँड रिसॉर्ट मध्ये राहण्याची उत्तम सोय होती. या सहलीबद्दल आयोजक प्रीती कडव यांना विचारले असता त्यांनी सांगितले की आपल्या धर्माची नवीन पिढीला माहिती रहावी म्हणून अनेक धार्मिक स्थळी सहल आयोजित केली जाते असे त्यांनी सांगितले.यापुढील काही सहली धार्मिक ठिकाणाबरोबर ऐतिहासिक ठिकाणी देखील नेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. सहलीमध्ये गणपती बाप्पा मोरया, छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी .. जय शिवराय, हर हर महादेव अशा उत्स्फूर्तपणे घोषणा दिल्या जात होत्या. सर्व पर्यटकांनी ट्रिप च्या आयोजक प्रीती टूर्स च्या सर्वोसर्वा प्रीती कडव मॅडम यांना धन्यवाद दिले.